## जलसंपत्ती विकास प्राधिकरण

सदस्याना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन.
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्र. प्रापापु१०९६/सीआर-११९५/पापु-०७
मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि. ३१ डिसेंबर, १९९६.

पहा:-१] या विभागाचा समक्रमांकाचा दि. ३० मे १९९६ चा शासन निर्णय
२] या विभागाचा समक्रमांकाचा दि. २५ सप्टेंबर, १९९६ चा शासन निर्णय

शासन निर्णय :-

या विभागाच्या उपरोक्त दि. ३० मे १९९६ च्या शासन निर्णयान्वये जलसंपत्ती विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. तर, दि. २५ सप्टेंबर, १९९६ च्या समक्रमांकाच्या शासन निर्णयान्वये प्राधिकरणावरील सदस्यांना द्यावयाचा दैनिकभत्ता व प्रवासभत्ता या संदर्भात आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि, सदर जलसंपत्ती विकास प्राधिकरणाचे एक सदस्य श्री. ए. के. डोनोलीकर यानी जलसंपत्ती विकास प्राधिकरणाच्या दि. १३ जून १९९६ रोजी झालेल्या पहिल्या बैठकीस उपस्थित रहाण्याकरिता नागपूर ते मुंबई व परत असा विमान मार्गे प्रवास केला होता. त्या बाबतच्या विमान प्रवासाचे भाडे रु. ५००४/- [ अक्षरी रुपये पाच हजार चार मात्र ] इतका खर्च त्यांना आला असून सदर प्रवास खर्चास [ नागपूर - मुंबई - नागपूर ] एक विशेष बाब म्हणून शासन कार्योत्तर मंजूरी देत आहे.

२. या करील खर्च "मागणी क्रमांक वाय-५-३४५१, सेक्रेटरीएट आर्थिक सेवा -०९०-सेक्रेटरीएट पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग [ ३४५१०४६७ ] ०२- प्रवास भत्ता" या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा व सदर खर्च त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

...२...

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ १२२०/९६/ सेवा-५, दि. १९ नोव्हेंबर, १९९६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

[ ग. गो. पंचभाई ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१] मा. राज्यपालाचे सचिव,

२] मा. मुख्यमंत्र्याचे सचिव,

३] मा. उपमुख्यमंत्र्याचे सचिव,

४] सर्व मंत्र्याचे स्वीय सहसय्यक.

५] सर्व राज्यमंत्र्याचे स्वीय सहाय्यक.

६] जलसंपत्ती विकास प्राधिकरणाचे सर्व सदस्य,

७] महालेखापाल १-२ [ लेखा व अनुज्ञेयता ] महाराष्ट्र राज्य मुंबई/ नागपूर.

८] महालेखापाल १-२ [ लेखा परिक्षा ] महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर.

९] अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

१०] निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.

११] सर्व मंत्रालयीन विभाग,

१२] सर्व विभागीय आयुक्त,

१३] सर्व जिल्हाधिकारी,

१४] सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

१५] सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ, मुंबई,

१६] पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी,

१७] पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने,

१८] निवडनस्ती पापु-०७.